ePaper
युद्धात इराणला मिळाला बलाढ्य देशाचा पाठिंबा; इस्रायलचं टेन्शन वाढलं
| वर्ष - 8 | अंक - 307 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)



www.mahaenews.com | सोमवार, दि. 16 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## तळेगावजवळ कुंडमळा येथे पूल कोसळून चार मृत्युमुखी, दोन बेपत्ता : 40 पर्यटकांना वाचवण्यात यश !

# मावळात मृत्यूचा पूल!

### युद्धपातळीवर बचावकार्य, जखमींवर मोफत उपचार, मृताच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 5 लाखाची आर्थिक मदत !

| तळेगाव / पुणे / मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**पुणे जिल्ह्यातील मावळमध्ये तळेगावजवळ पर्यटनस्थळ असलेल्या कुंडमळ्यात इंद्रायणी नदीवरील पूल कोसळल्याने नदीत पडून चार पर्यटक मृत्युमुखी पडले तर दोघे बेपत्ता आहेत. सहा पर्यटकांची प्रकृती गंभीर आहे, असे रुग्णालयातून सांगण्यात आले. यावेळी दुथडी भरून वाहणाऱ्या इंद्रायणीतून ४० पर्यटकांना वाचविण्यात 'एनडीआरएफ' ला यश आले आहे.**



### तातडीच्या बचतकार्यामुळे..

कुंडमळ्यामध्ये प्रत्येक शनिवार-रविवारी पर्यटकांची गर्दी उसळलेली असते. अशीच गर्दी असताना या जुन्या लोखंडी पुलावर साधारण शंभर ते सव्वाशे पर्यटकांनी गर्दी केली आणि तो जुना पूल मधोमध तुटला, काही पर्यटक नदीमध्ये कोसळले आणि वाहू लागले. ही घटना दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. बातमी वाऱ्यासारखी पसरली. घटनास्थळी तळेगाव दाभाडे पोलीस दाखल झाले. 'एनडीआरएफ' च्या तुकड्याही दाखल झाल्या आणि तातडीने बचतकार्य हाती घेण्यात आले.

### पर्यटनस्थळावर गर्दी...

मावळमधील कुंडमळा हे पर्यटनस्थळांपैकी एक आहे. पावसाळ्यात दुथडी भरून वाहणारी इंद्रायणी नदी, हिरवागार परिसर यामुळे येथे पर्यटकांची गर्दी असते. सुट्टीचा दिवस असल्याने मोठ्या संख्येने पर्यटक या भागात आले होते. पुलावर जास्त झाल्याने वजन प्रमाणाबाहेर गेल्यामुळे हा पूल कोसळला.

### 40 पर्यटकांची यशस्वी सुटका

तातडीने मदतकार्य हाती घेण्यात आल्यामुळे चाळीस पर्यटकांची यशस्वीरीत्या सुटका करण्यात आली. चार जणांचा मृत्यू झाला असून अजून दोन जण बेपत्ता असल्याचे सांगण्यात आले. अद्याप कुंडमळ्यात किती पर्यटक बुडाले आहेत, याबाबत अद्याप आकडा स्पष्ट होऊ शकला नाही. घटनास्थळी अग्निशमन दल, मावळ वन्यजीव रक्षक यांची टीम पोहचली असून उशिरापर्यंत बचावकार्य सुरू होते.

### राज्यातील सर्व पुलांचे 'स्ट्रक्चरल ऑडिट'..

तळेगावजवळील कुंडमळा येथील पुलाच्या दुर्घटनेनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील सर्व पुलांचे 'स्ट्रक्चरल ऑडिट' करण्याचे आदेश दिले आहेत. सर्व पुलांचे असे ऑडिट झाल्यानंतर ज्या ठिकाणी आवश्यक आहे, तेथील पुलांची दुरुस्ती त्वरित करावी, असेही त्यांनी आदेशात म्हटले आहे. या डागडुजीसाठी निधीची कमतरता भासणार नाही, असे शिंदे म्हणाले. तसेच सर्व पर्यटन स्थळांवर सुरक्षेची तरतूद करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

### अजित पवार 'ॲक्शन मोड' मध्ये

जुना आणि सडलेला पूल असल्याने तो कोसळला, अशी एका वाक्यात पालकमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली. तसेच नवा पूल बांधण्याचीही घोषणा केली आहे.

# पुण्याला पाणीप्रश्न भेडसावणार!

## माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांचे मत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'मेट्रोच्या हिंजवडी-शिवाजीनगर मार्गिकेच्या कामामुळे हिंजवडी आयटी पार्क परिसरात पाणी साठत आहे. त्यामुळे पालखी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ होण्यापूर्वी अडथळे दूर झाले नाहीत, तर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) मेट्रो मार्गाचे काम करणाऱ्या कंपनीला दहा कोटी रुपये दंडाची नोटीस पाठवावी,' असे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी दिले.**



पाण्याची राजधानी म्हटल्या जाणाऱ्या पुण्याला चार धरणांमधून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, आगामी १५-२० वर्षांत पुण्यालाही पाण्याचा प्रश्न भेडसावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत शहराच्या विविध भागांत सुमारे तीन हजार टँकरनी पाणीपुरवठा केला जातो. त्याचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढेल,' असे मत माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी रविवारी व्यक्त केले. वाढत्या मागणीच्या तुलनेत नैसर्गिक पाणीसाठा अपुरा पडत असल्याने जलसंवर्धनाची मोहीम राबविण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. गंगोत्री होम्स'च्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते पर्यावरण संवर्धनासाठी काम करणाऱ्या मेधा ताडपत्रीकर यांना 'गंगोत्री होम्स पृथ्वी पुरस्कार,' तर अनिकेत लोहिया यांना 'गंगोत्री होम्स जल पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. त्याप्रसंगी जावडेकर बोलत होते.

'गंगोत्री होम्स'चे संचालक राजेंद्र आवटे, गणेश जाधव, मकरंद केळकर या वेळी उपस्थित होते. याच कार्यक्रमात पुरस्कार निवड समितीचे सदस्य आनंद अवधानी, पूर्वा केसकर, संदीप सोनिग्रा यांना सन्मानित करण्यात आले. जावडेकर म्हणाले, 'वाढती लोकसंख्या आणि हवामान बदलामुळे पिण्याच्या पाण्यासारख्या गंभीर समस्याही निर्माण होत आहेत. पाण्याचा वापर कमी करून पाणीसाठे वाढवण्याला प्राधान्य द्यायला हवे. आता 'पाणी वाचवा आणि पाणी वाढवा' हा मूलमंत्र घेऊन काम करावे लागणार आहे. देवराईसारख्या परंपरा असलेल्या या देशाची मूळ जीवनशैली पर्यावरणाला पूरक अशीच आहे. ती टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.'रुद्र' या संस्थेच्या माध्यमातून प्लास्टिक प्रश्नावर काम करणाऱ्या ताडपत्रीकर म्हणाल्या, 'निसर्गाला आपली गरज नाही. आपल्याला निसर्गाची गरज आहे, हे ओळखून काम करायला हवे. एकट्याने केल्याने काय होणार, असे न मानता माझ्या कामातून काय बदल घडवता येईल, त्याचा विचार करायला हवा.' 'मानवलोक' या संस्थेच्या माध्यमातून मराठवाड्यातील पाणी प्रश्नावर काम करणारे लोहिया म्हणाले, 'गेल्या २५ दिवसांपासून चांगला पाऊस आहे. मात्र, आजही अंबाजोगाई, बीडमध्ये पिण्याचे पाणी १५ दिवसांनी मिळते. मराठवाड्यातील पाणी समस्येमुळे स्थलांतराची समस्या निर्माण झाली. आता वृद्ध, स्त्रिया आणि बालकांवर त्याचे गंभीर परिणाम होत आहेत.'सध्या प्लास्टिकपेक्षाही वापरलेल्या प्लास्टिकचे संकलन, वर्गीकरण न होणे ही मोठी समस्या निर्माण झाली आहे. इमारतींसाठी पर्यावरणाचे नियम आणखी कडक करायला हवेत. पर्यावरणाचा समतोल राखून विकास साधता येतो. त्यासाठी पर्यारणप्रेमींनीही टोकाची भूमिका न घेता उत्तरे शोधण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

### मागणीच्या तुलनेत पाणीसाठा अपुरा

पुण्यालाही पाण्याचा प्रश्न भेडसावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत शहराच्या विविध भागांत सुमारे तीन हजार टँकरनी पाणीपुरवठा केला जातो. त्याचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढेल,' असे मत माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांनी रविवारी व्यक्त केले. वाढत्या मागणीच्या तुलनेत नैसर्गिक पाणीसाठा अपुरा पडत असल्याने जलसंवर्धनाची मोहीम राबविण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. गंगोत्री होम्स'च्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रकाश जावडेकर यांच्या हस्ते पर्यावरण संवर्धनासाठी काम करणाऱ्या मेधा ताडपत्रीकर यांना 'गंगोत्री होम्स पृथ्वी पुरस्कार,' तर अनिकेत लोहिया यांना 'गंगोत्री होम्स जल पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले.

# हिंजवडीमध्ये पहिले पाढे पंचावन्न!

## आयटी पार्कमध्ये पाऊस अन् यंत्रणांचा पुन्हा तोच खेळ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमध्ये गेल्या आठवड्यात झालेल्या पावसात काही रस्त्यांना नद्यांचे रूप आले होते. हीच परिस्थिती पुन्हा या आठवड्यात असून, शासकीय यंत्रणांची संयुक्त बैठक होऊन उपाययोजनांची केवळ घोषणा झाल्याने प्रत्यक्षात आयटी पार्कमधील स्थिती 'जैसे थे' आहे.**



पुणे आता अलिबागचा किनारा बनला आहे. त्याचा पत्ता हिंजवडी टप्पा दोन, आयटी सिटीच्या शेजारी आणि गोंधळाच्या नजीक असा आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना बहुदा आयटी पार्कमधील कर्मचाऱ्यांना 'किनारा तुमच्या घरापर्यंत' अशी सुविधा द्यावयाची असावी,' असा टोमणा या परिस्थितीबाबत 'फोरम फॉर आयटी एम्प्लॉइज'ने मारला आहे.हिंजवडीतील आयटी पार्कमध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचल्यावरून शासकीय यंत्रणांवर टीकेची झोड उठली होती. आयटी पार्कचे रुपांतर यंत्रणांनी वॉटर पार्कमध्ये केल्याची टीका करण्यात आली होती. यानंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासह (एमआयडीसी) सर्व शासकीय यंत्रणांची बैठक घेऊन तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. या उपाययोजना करण्यासाठी त्यांनी १५ जूनची अंतिम मुदत दिली होती. मात्र, त्यानंतरही आयटी पार्कमधील परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. सध्या सुरू असलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचत आहे. या पाण्यातून वाहने वाट काढत आहेत.हिंजवडीतील मेगापोलीस गृहनिर्माण संकुलातील रहिवाशांनी याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.'आमच्या समस्यांकडे शासकीय यंत्रणा, नेत्यांनी तातडीने लक्ष द्यावे,' अशी मागणी त्यांनी केली. याचबरोबर आयटी पार्कला भेडसावणाऱ्या रस्ते आणि कचऱ्याबाबतच्या समस्याही त्यांनी मांडल्या. आधीप्रमाणे आताही पाऊस पडल्यानंतर रस्त्यांवर पाणी साचत आहे. पीएमआरडीए आणि एमआयडीसीकडून गेल्या काही दिवसांत सुरू असलेल्या तात्पुरत्या उपाययोजनांमुळे साचणाऱ्या पाण्याची पातळी आता गुडघ्यापर्यंत आली आहे. दीर्घकालीन उपाययोजना नसल्याने परिस्थितीत फारशी सुधारणा झालेली नाही.पुणे आता अलिबागचा किनारा बनला आहे. त्याचा पत्ता हिंजवडी टप्पा दोन, आयटी सिटीच्या शेजारी आणि गोंधळाच्या नजीक असा आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना बहुदा आयटी पार्कमधील कर्मचाऱ्यांना 'किनारा तुमच्या घरापर्यंत' अशी सुविधा द्यावयाची असावी,' असा टोमणा या परिस्थितीबाबत 'फोरम फॉर मारला आहेपाणी मोठ्या प्रमाणात साचल्यावरून शासकीय यंत्रणांवर टीकेची झोड उठली होती.-

### 15 जूनची अंतिम मुदत

आयटी पार्कचे रुपांतर यंत्रणांनी वॉटर पार्कमध्ये केल्याची टीका करण्यात आली होती. पीएमआरडीएआयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासह (एमआयडीसी) सर्व शासकीय यंत्रणांची बैठक घेऊन तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. या उपाययोजना करण्यासाठी त्यांनी १५ जूनची अंतिम मुदत दिली होती.

## पिंपरी-चिंचवड बालेकिल्ला पुन्हा काबीज करण्यासाठी

# पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादीचे उद्या स्वतंत्र मेळावे!

## शरद पवार आणि अजित पवार करणार मार्गदर्शन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी सर्वच पक्ष जोरदार तयारी करीत आहेत. पिंपरी-चिंचवड बालेकिल्ला पुन्हा काबीज करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार व शरद पवार हे दोन्ही पक्ष सक्रिय झाले आहेत. त्यादृष्टीने उद्या मंगळवारी शहरात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार शरद पवार यांचे स्वतंत्र मेळावे होणार आहेत. काका व पुतणे काय बोलणार याची उत्सुकता निर्माण झाली आहे.**



महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग रचना तयार करण्याचे कामकाज सुरू झाले आहे. दिवाळीच्या धामधुमीत निवडणुकीचा बार उडणार आहे. त्यासाठी सर्वच राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. माजी नगरसेवक व इच्छुक पुन्हा सक्रिय झाले आहेत. फेब्रुवारी २०१७ ला राष्ट्रवादी काँग्रेसची गेलेली सत्ता पुन्हा काबीज करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार हे सरसावले आहेत. त्यादृष्टीने स्थानिक पदाधिकारीही कामाला लागले आहेत. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात गेलेले स्थायी समितीचे माजी सभापती अजित गव्हाणे यांच्यासह अनेक माजी नगरसेवक पुन्हा स्वगृही परतत आहेत.

त्यासाठी अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत येत्या मंगळवारी भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृहात पक्षाचा कार्यकर्ता मेळावा आयोजित केला आहे. त्यात अजित पवार काय बोलतात, याकडे लक्ष लागले आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा कार्यकर्ता मेळावा त्याच दिवशी ताथवडे येथील एका हॉटेलमध्ये आयोजित केला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि आम आदमी पार्टीचे पदाधिकारी राष्ट्रवादीत प्रवेश करणार आहेत. त्या मेळाव्यात पक्षाचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार हे कार्यकर्त्यांना काय कानमंत्र देतात, याची उत्सुकता निर्माण झाली आहे. मेळाव्यास प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व खासदार डॉ. अमोल कोल्हे हे उपस्थित राहणार आहेत.

एकाच दिवशी शहरात काका व पुतळे यांचे स्वतंत्र मेळावे होणार आहेत. त्यामुळे कोणत्या

### निवडणुकीत तरुणांना संधी देणार

राष्ट्रीय नेते शरद पवार हे मंगळवारी पिंपरी-चिंचवडमध्ये येणार आहेत. ते ताथवडे येथील मेळाव्यात पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. त्या मेळाव्यात मनसे व आपचे कार्यकर्ते पक्षात प्रवेश करणार आहेत. महापालिका निवडणुकीत अधिकाधिक तरुणांना संधी देण्याचे वरिष्ठ नेत्यांचे नियोजन आहे. त्यादृष्टीने तयारी सुरू आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शदरचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी सांगितले.

### अजितदादांच्या नेतृत्वाखाली लढणार

पक्षाचे सर्वेसर्वा व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षाचा कार्यकर्ता मेळावा भोसरी येथे मंगळवारी आयोजित केला आहे. त्यात शहरातील पदाधिकारी व माजी नगरसेवक पक्षात प्रवेश करणार आहेत. आमचे जुने सहकारी घरवापसी करत आहेत. आगामी महापालिका निवडणुकीसाठी अजितदादा मार्गदर्शन करणार आहेत, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) शहराध्यक्ष योगेश बहल यांनी सांगितले.

---

## वर्षभरात पीएमआरडीएकडे ३५० तक्रारी!

## सर्व तक्रारी निरसन झाल्याचा प्रशासनाचा दावा

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) गेल्या वर्षभरात वेगवेगळ्या विभागाच्या जवळपास ३५० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये अतिक्रमण बांधकाम व निर्मूलन विभाग, जमीन व मालमत्ता विभाग तसेच, विकास परवानगी विभागाच्या सर्वाधिक तक्रारी असल्याचे दिसून येते. काही तक्रारी या कार्यालयात देखील देण्यात आलेले आहेत. तर, केंद्र शासनाच्या पीजी पोर्टल अर्थात प्रशासकीय सुधारणा आणि लोक शिकायत या पोर्टलवर ५४ तक्रारी प्राप्त झालेले आहेत.**




- **एकूण 350 तक्रारी वर्षभरात प्राप्त**
- **सर्व तक्रारींवर कार्यवाही झाल्याचा प्रशासनाचा दावा**
- **नागरिकांच्या सहभागामुळे तक्रारींचे त्वरित निरसन शक्य**


पीएमआरडीएचे वेगवेगळे ११ विभाग आहेत. त्यामध्ये अतिक्रमण बांधकाम व निर्मूलन विभाग, प्रशासन विभाग, विकास परवानगी विभाग, नियोजन विभाग, अभियांत्रिकी १ आणि २, अग्निशामन नियंत्रण विभाग, जमीन व मालमत्ता विभाग त्याचप्रमाणे वित्तीय विभाग आणि दक्षता विभाग देखील कार्य करीत आहे. पीएमआरडीएमध्ये पिंपरी-चिंचवड, पुणे आणि ग्रामीण भागाचा मोठा परिसर जोडला आहे. नऊ तालुक्याचा कारभार आहे. दरम्यान, आकुर्डी आणि औंध या दोन ठिकाणी कार्यालय आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना विविध कामांसाठी या कार्यालयात वारंवार हेलपाटे मारावे लागतात. एकाच वेळी कामे होत नसल्याने नाईलाजाने नागरिकांना तक्रारी कराव्या लागत आहेत. त्यातच अतिक्रमण झाल्याबाबत, दस्त अथवा कागदपत्रे न मिळण्याबाबत, बांधकाम परवाना मंजुरी विलंब होणेबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. मात्र या तक्रारी तातडीने संबंधित विभागाला पाठवून त्याचे निरसन करत असल्याची माहिती प्रशासन विभागाने दिली. "तक्रारी नोंदवण्याची प्रक्रिया सुलभ झाली आहे, परंतु भविष्यात तक्रारच निर्माण होणार नाही अशी कार्यपद्धती विकसित करावी," अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

### प्रादेशिक आणि तालुकास्तरीय कार्यालयाला गती द्या

पीएमआरडीए प्रशासन चार प्रादेशिक आणि नऊ तालुकास्तरीय कार्यालये सुरू करणार आहे. आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी पीएमआरडीए हद्दीचा विस्तार पाहता तेथील नागरिकांना कामानिमित्त आकुर्डी किंवा औंध कार्यालयात यावे लागू नये व त्यांची कामे त्यांच्या तालुक्यातच व्हावीत यासाठी पीएमआरडीए कार्यालयाचे विकेंद्रीकरण करण्याचा निश्चय केला आहे. पैकी तीन कार्यालये सुरू करण्यात आली आहेत. बाकी कार्यालयासाठी ही जागा पहाणे सुरू असून त्या कामालाही गती देऊन नागरिकांची कामे त्यांच्याच तालुक्यात झाल्यास कामासाठी होत असलेल्या तक्रारी कमी होतील अशा प्रतिक्रिया नागरिकांच्यामध्यातून व्यक्त होत आहेत.

# भरतशेठ थेट बोलून गेले, फुटीचे पोल खोलून गेले!

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### मी फक्त एका नामातच आहे.

मनुष्य कितीही मोठा असला, उत्तम पुराण आणि प्रवचन सांगणारा जरी असला, तरी तो जर नामात रहात नसेल किंवा त्याच्या संगतीत परमेश्वराचे प्रेम लागत नसेल, तर तो कदापिही संत म्हणून समजला जाणार नाही. संतांचे नातेवाईक संत असतातच असे नव्हे. आपण नोकरी केली तर आपला मुलगा नोकरी करीलच असे काही नाही; तसेच जो भगवंताचा आहे त्याचा मुलगा भगवंताचा असेलच असे नाही. संत जरी झाला तरी त्याने चार माणसांसारखेच वागावे. काहीतरी वागणे हे संताचे वागणे नव्हे. अत्यंत निर्भयता हा संतांचा पहिला गुण होय; कारण ' सर्व ठिकाणी मीच आहे ' ही भावना झाल्यावर भयाचे कारणच उरत नाही. साधूच्या अंत:करणामध्ये भयाचा संकल्प नसल्यामुळे वाघ, सिंह, साप त्याला त्रास देत नाहीत. अगदी जंगली वाघाकडे देखील निर्भयतेने नजरानजर केली तर तो अंगावर येत नाही; शिवाय, साधूंच्या शुद्ध अंत:करणाचाही त्याच्यावर परिणाम होतो. अशा रीतीने, संतांच्या अंत:करणाची प्राणिमात्रांनासुद्धा जाणीव असते. अशा संतांचा सहवास मिळणे ही फार भाग्याची गोष्ट आहे. परमेश्वराचे प्रेम लागणे किंवा सतत मुखात नाम येणे, हेच संतांच्या संगतीत राहून साधायचे असते. संतांची अखंड संगत नामानेच ठेवता येईल. जिथे नाम आहे तिथे संतांचा सहवास आहे. तुकाराम महाराजांसारखे संतसुद्धा देवापाशी मागताना ' तुझा विसर न पडावा ' हेच मागतात. तसेच रामदासस्वामी देवाला म्हणतात, 'तुझा योग, म्हणजे तुझा सहवास, मला नित्य घडू दे.' ' योग असणे ' म्हणजे दुसरे काही नसून, मन जेव्हा अनुसंधानापासून अलिप्त होऊन इतर विचारांत भरकटते, तेव्हा त्याला आवरून परत अनुसंधानात लावणे. हीच योगशक्ती.

हुकूम कितीही कडक असेना का, परंतु त्याच्याखाली जर सही नसेल तर त्या हुकुमाला महत्त्व नाही. साहेबाच्या सहीच्या कागदाला महत्त्व आहे. नाम हे सर्व साधनांत सहीसारखे आहे. एका मुलाला अत्यंत राग येत असे. रागाच्या भरात तो आपले डोके आपटून घेई. त्याला मी सांगितले, ' रोज स्नान झाल्यावर आपल्या पोटावर गंधाने रामनाम लिहून ठेव, आणि ज्या ज्या वेळी राग येईल त्या त्या वेळी त्या नामाकडे पहा; ' आणि त्या प्रयोगाने त्या मुलाचा राग आपोआप शांत झाला. खरोखर, नामात किती प्रचंड शक्ती आहे ! अनुभव घेऊनच पहा. मी आजपर्यंत सर्वांना नामच सांगत आलो आहे. मी इथे नाही, मी तिथे नाही, मी गेलो नाही, मी जात नाही; मी फक्त एका नामातच आहे. ज्याच्याजवळ भगवंताचे नाम आहे, त्याच्या मागे-पुढे मी आहेच.

**बोधवचन:- तुम्ही भगवंताचे नाम घ्यावे ह्यापलीकडे, सत्य सांगतो, मला कसलीही अपेक्षा नाही.**




'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक


**वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची मूळ शिवसेना फुटल्यानंतर उद्धव ठाकरे गट आणि एकनाथ शिंदे गट एकमेकांविषयी सरळ बोलण्याचे नाव घेत नाहीत. एकमेकांचा उद्धार करणे, अगदी खालच्या दर्जाची भाषा वापरणे, संधी मिळेल, तेव्हा डिवचणे, सुरू असतेच.. उद्धव ठाकरे यांच्या गटाकडून स्वतः उद्धव आणि त्यांचे प्रवक्ते संजय राऊत हे एकनाथ शिंदेंचा उल्लेख गद्दार किंवा मिंध्ये केल्याशिवाय शब्द उच्चारत नाहीत.. त्याचप्रमाणे, शिंदे गटाकडून म्हणजेच आत्ताच्या शिवसेनेकडून संजय शिरसाट किंवा गुलाबराव पाटील हे तोंडसुख घेताना दिसतात. त्यात आता भर पडली आहे ती भरत गोगावले यांची!**



#### शिवसेना पक्षाच्या फुटीची सल..

आपल्याला माहीत आहेच, की हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेल्या शिवसेना पक्षात फूट पडली. या फुटीनंतर शिवसेना या पक्षाचे दोन तुकडे झाले. एक उद्धव ठाकरेंचा आणि दुसरा एकनाथ शिंदे यांचा! अर्थात नंतर शिंदे यांच्या गटाला मूळ शिवसेना हे नाव मिळाले आणि पक्षाचे चिन्ह धनुष्यबाणही त्यांनाच मिळाले. शिवसेना या पक्षाच्या फुटीची सल शिवसैनिकांच्या मनातून काही जाताना दिसत नाही.

#### गोगावले नेमके काय म्हणाले?

शिवसेना फुटीचा विषय निघाला, की दोन्ही गटातील शिवसैनिकांकडून काही घटना, आठवणींवर भाष्य करताना भावना आपसूक व्यक्त केल्या जातात. अशातच शिवसेनेचे प्रमुख उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते आणि आत्ताचे राज्याचे मंत्री भरत गोगावले यांनी मोठा खळबळजनक दावा केला आहे. शिवसेना पक्षाच्या फुटीमागे उद्धव ठाकरे यांची पत्नी रश्मी वहिनींचा हात असल्याचा बॉम्बच गोगावलेंनी टाकला आहे.

#### बाहेर पडायला अनेक कारणे..

भरत गोगावले म्हणाले, की आम्ही शिवसेनमधून बाहेर पडायला अनेक कारण आहेत. महिलांचा कुठपर्यंत हस्तक्षेप असायला पाहिजे, याचा विचार करायला पाहिजे. पडद्यामागून रश्मी वहिनींचा फारच मोठा हस्तक्षेप होता. 'महाविकास आघाडी' ची सत्ता असताना मुख्यमंत्रीपद हे एकनाथ शिंदे यांना दिले पाहिजे होते आणि आदित्य ठाकरे यांना कॅबिनेट मंत्रीपद द्यायला नको होते. पक्षातील लोकांना संधी द्यायला हवी होती, असे गोगावले यांनी स्पष्टपणे सांगून टाकले आहे.

#### कुठे बाळासाहेब आणि कुठे उद्धवसाहेब?

बाळासाहेबांच्या कामाची पध्दत, आक्रमकपणा आणि बोलण्यावर ठाम राहण्याची हातोटी आम्हाला उध्दवसाहेबांमध्ये दिसलीच नाही. माझ्या वाढदिवसाला बाळासाहेबांना भेटायला गेलो, तेव्हा बाळासाहेब बोलले, खाली बसायचे नाही, तुला खुर्ची मी देणार आहे आणि काढून घेणाराही मीच आहे. वंदनीय बाळासाहेब गेल्यानंतरचा कारभार आम्हाला आवडला नाही. गोगावले यांचे स्पष्ट बोलणे वर वर साधेपणाचे दिसते, पण त्यांचा बोलविता धनी कोण? हे आता पाहायला हवे.

#### राजकारणातला वेगळाच प्रयोग..

महाराष्ट्रात सुमारे पाच वर्षांपूर्वी राजकारणात वेगळाच प्रयोग झाला होता. 'महाविकास आघाडी' च्या निमित्ताने कॉंग्रेस-राष्ट्रवादी कॉंग्रेस सोबत शिवसेना सत्तेत वाटेकरी झाली होती. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले, तर आदित्य ठाकरे यांच्या गळ्यात कॅबिनेटची माळ पडली होती. राज्यातील सर्वात तरुण मंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली होती. त्यावेळी त्याची खूप चर्चा ही झाली होती. पण, सर्व सामान्य शिवसैनिकाला या दोन्हीही गोष्टी पटल्या नव्हत्या. तरी देखील अनेकांनी तोंडाला कुलूप लावले, हे गोगावले यांचे म्हणणे, पूर्ण महाराष्ट्राने अनुभवले आहे.

#### गोगावले यांचा थेट आरोप..

आता एकनाथ शिंदे यांच्या शिलेदाराने नेमका शिवसेना फुटीचा धागा पकडून आदित्य ठाकरे यांना मंत्रीपद द्यायला नको होते असा सूर आळवला आहे. आदित्य ठाकरे यांना राजकारणाचे बाळकडू लहानपणापासूनच मिळाले आहे. 'मातोश्री' हेच राजकीय केंद्र असल्याने त्यांचा राजकीय प्रवास तसा बालपणापासूनच झाला आहे. सिनेटपासून अनेक निवडणुकीचा त्यांनी अगोदर अनुभव घेतला. आदित्य यांना पहिल्यांदा वरळी मतदारसंघातून त्यांना आमदारकी लढवण्याची संधी मिळाली . तेव्हापासून ते राजकारणात सक्रिय आहेत. त्यानंतर 'महाविकास आघाडी' त त्यांना थेट कॅबिनेट मंत्रीपदाची लॉटरी लागली होती, हे सर्वांना आठवत असेलच.

#### आदित्य यांच्या मंत्रिपदामुळे नाराजी..

आदित्य ठाकरे यांना त्यावेळी शिवसेनेने कॅबिनेट मंत्रीपद दिले होते. त्यावर भरत गोगावले यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यावेळी आदित्य ठाकरे यांना मंत्रीपद द्यायला नको होते. पक्षातील अनेक ज्येष्ठ नेत्यांना संधी दिली पाहिजे होती, असे वक्तव्य त्यांनी केले आहे. इतकेच नाही तर त्यांनी 'महाविकास आघाडी' ची सत्ता असताना मुख्यमंत्रीपद हे एकनाथ शिंदे यांना दिले पाहिजे होते, हे गोगावले यांचे म्हणणे प्रत्येक शिवसैनिकाच्या तोंडी त्यावेळी होते.. कदाचित, तसे झाले असते तर शिवसेनेत फूट पडलीच नसती.

#### पत्नीचे ऐकणारे उद्धव ठाकरे..

भरत गोगावले यांचा मुख्य आक्षेप हा रश्मीवहिनींवर आहे. उद्धव ठाकरे हे आपल्या पत्नीचे खूप म्हणजे जवळजवळ प्रत्येक गोष्ट ऐकतात. पण, प्रत्यक्षात त्यांनी रश्मी वहिनींचे नाव स्पष्टपणे घेतले नाही.उद्धव ठाकरे बाईचे ऐकत होते. त्यांचा प्रत्यक्ष रोख हा रश्मी ठाकरे यांच्यावरच होता. नाव न घेता भरत गोगावले यांनी फुटीमागील अनेक कारणांपैकी रश्मी ठाकरे पण एक कारण असल्याचे म्हटले आहे.

#### महिलांचा हस्तक्षेप कुठपर्यंत?

महिलांचा कुठपर्यंत हस्तक्षेप घ्यायला पाहिजे, याचाही विचार करायला पाहिजे. पडद्यामागून वहिनींचा हस्तक्षेप बराचसा होता. उध्दवसाहेबांच्या मनात अनेक गोष्टी असायच्या. मात्र, नंतर बदल व्हायचा, असा आरोप गोगावले यांनी केला आहे.

#### ताकदवान नेत्याला डावलले..

वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी स्वतः कधीही कोणत्याही पदाची अपेक्षा केली नाही. जेव्हा संधी मिळाली त्यावेळी क्रमांक दोन च्या नेत्याला त्यांनी पुढे केले. त्यामुळेच मनोहर जोशी आणि नारायण राणे हे मुख्यमंत्री झाले. स्वतः बाळासाहेब कधीही मोठी पदे मिळवू शकले असते. त्यामुळेच त्यांची ही गोष्ट प्रत्येक शिवसैनिकाच्या मनात ठसली होती. नेमके उद्धव ठाकरे येथेच चुकले. त्यांच्यानंतर पक्षातील सर्वात ताकदवान नेता म्हणजेच एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले असते तर कदाचित शिवसेनेतील ही फूट पडलीच नसती, आणि महाराष्ट्रातील एक बलवान पक्ष म्हणून शिवसेना पुढे आली असती. पण, ही झाली जर तर ची भाषा ! भरत गोगावले बरेच काही बोलून गेले असले तरी अन्य शिवसैनिकांच्या मनात अजून खदखद कायम आहे, ती आज ना उद्या बाहेर पडणारच आहे, आपण वाट पाहू या !



**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महात्मा गांधी आणि मराठी साहित्य




**महात्मा गांधी या विषयावर मराठी साहित्यिकांचा प्रतिसाद एक साहित्यिक म्हणून अतिशय कोता राहिला. मराठी साहित्यिकांनी याचा योग्य उपयोग केला नाही. या विषयावर न येथे प्रेमचंद निर्माण झाला, न येथे ताराशंकर बंदोपाध्याय निर्माण झाला. दुसऱ्या काही बाबतीत मराठीत सुंदर साहित्य निर्माण झालं. मराठीमध्ये महाकाव्य झालं, ना महाकादंबरी झाली..**

साहित्य शब्दाची व्युत्पत्ती विनोबांनी अशी सांगितली आहे की 'जे सहित चालतं ते साहित्य'. म्हणून आपण म्हणतो, स्वयंपाकाचं साहित्य, प्रयोगाला लागणारं साहित्य, अंत:क्रियेचं साहित्य. म्हणजे साहित्य हे निरपेक्ष नसतं. ते स्वत:च्या पायावर कधीच उभं राहत नाही. साहित्याला कोणता तरी संदर्भ लागतो, आधार लागतो. तो समाजाचा असेल, जीवनाचा असेल, मानवी भावनांचा असेल किंवा ऐतिहासिक असेल. कशाच्या तरी साहाय्याने साहित्य उभं राहतं. या लेखामध्ये मी मराठी साहित्याने महात्मा गांधी या संदर्भाशी काय नातं जोडलं, काय न्याय केला याचा विचार करणार आहे.मराठी साहित्य आणि गांधी यांचा विचार करताना माझ्या मनामध्ये काही प्रश्न येतात. महात्मा गांधी हा एवढ्या मोठ्या उंचीचा व इतिहास घडवणारा माणूस कसा काय निर्माण झाला? अर्नोल्ड टॉयनबी यांना विसाव्या शतकाचा सर्वश्रेष्ठ इतिहासकार



मानण्यात येतं. त्यांचा 'STUDY OF HISTORY' हा जागतिक इतिहासाचा श्रेष्ठ ग्रंथ मानला जातो. त्यात ते इतिहासात होऊन गेलेल्या जवळपास पन्नास सभ्यतांचं विश्लेषण करतात. परिस्थितीशी सामना करताना काही सभ्यता आव्हानांसमोर हरतात, रसातळाला जातात. काही टिकतात, पण खुज्या होतात. काही मात्र जिंकतात, वर उठतात. हे कशावरून ठरतं? याचं उत्तर टॉयनबी स्वत: असं देतात की, जेव्हा त्या काळाच्या परिस्थितीमधनं एखाद्या समाजाच्या, संस्कृतीच्या अस्तित्वाला एक विराट आव्हान येतं, तेव्हा फक्त मोजक्या सभ्यतांच्या बाबतीत असं घडतं की, 'THERE COMES A HERO', एक महानायक येतो. तो महानायक त्यावेळच्या मानवसमूहाला उच्च स्वप्न, शब्दावली, मार्ग आणि रोज करण्याचे कार्यक्रम देतो. सगळा जनसमूह अनेक वर्षे त्या महानायकाच्या मागे जातो आणि यावरून त्या सभ्यतेचं भवितव्य ठरतं.या स्पष्टीकरणाच्या पार्श्वभूमीवर पाहिलं तर एका विशिष्ट काळातच गांधी का निर्माण झाला याचं उत्तर आपल्याला मिळायला लागतं. ब्रिटिशांच्या गुलामीचं आव्हान, भारतातली विलक्षण गरिबी-आध्यात्मिक आणि भौतिक दोन्ही प्रकारची गरिबी, भित्रे, कमजोर भारतीय, माना झुकवणारे-तुकवणारे भारतीय, जातीवादाने आणि धार्मिक भेदाने फाटाफूट झालेला हा देश, स्त्रियांना-अस्पृश्यांना कायमच वाळीत टाकलेला हा देश. अशा स्थितीच्या या विलक्षण विराट आव्हानांसमोर गांधी नावाचा एक महानायक उभा राहिला आणि पस्तीस वर्षांत त्याने या देशाचा चेहरा बदलवून टाकला. हा महानायक इतका विराट होता की, जेव्हा आपल्या देशातले लोक त्याच्या अगदी जवळ उभे राहिले, तेव्हा त्यांना फक्त त्याच्या पायातल्या वाहणेचा अंगठाच दिसला. पुतळा फार विराट आहे. तुम्ही जेव्हा फार जवळ असता आणि जे बघायचं आहे ते फार विराट असतं, तेव्हा तुम्हाला फक्त थोडेसे मातीचे पाय दिसतात. आपलं असं झालं का? मराठी साहित्यिकांचं असं झालं का? विसाव्या शतकामध्ये गांधींसोबत, गांधी विचारांसोबत, मराठी साहित्यिकांनी न्याय केला का?माझं ढोबळ निरीक्षण असं की, वैचारिक क्षेत्रामध्ये न्याय केला. त्याचं प्रमुख कारण साक्षात विनोबाच होते. त्यांची वैचारिक व नैतिक उंची व शुभ्रता हिमालयासारखी होती. गांधींच्या तत्त्वज्ञानावर त्यांनी मराठीत भरपूर लिहिलं आणि तेही अशा मार्मिक सूत्रबद्ध पद्धतीने की ती मराठीत एक नवी शैलीच झाली. त्याचबरोबर काका कालेलकर, आचार्य जावडेकर, आचार्य दादा धर्माधिकारी असे गांधी विचारांचे अनेक विचारक झाले. तिथपासून तर रामदास भटकळ, नागपुरातले सुरेश पांढरीपांडे या सर्वांनी गांधी विचारांच्या बाबतीत लिहिलं आहे. पण ललित साहित्याकडे यावं तर मात्र वाळवंटच आढळतं. साने गुरुजी हे एक नाव ठळकपणे नजरेसमोर येतं. तुकडोजी महाराज हे दुसरं नाव घेता येईल. मामा वरेरकर, वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, बोरकर किंवा वा. कृ. चोरघडेंच्या साहित्यामध्ये गांधींशी सहानुभूतीच्या छटा दिसतात.

## संपादकीय »

### तरीही गगन ठेंगणे..!

***मानवाच्या आदिम स्वभावाला जमिनीपेक्षा जलमार्ग आणि हवाई मार्गांची भीती अंमळ अधिक वाटते. ते नैसर्गिकच.***

भीषणतम' अशा एकाच शब्दात गुरुवारी घडलेल्या अहमदाबाद विमान दुर्घटनेचे वर्णन करता येईल. एकाच विमानाच्या अपघाताची ही भारतातील आजवरची सर्वांत भीषण दुर्घटना. 'बोइंग' या अमेरिकी कंपनीच्या सर्वाधिक प्रतिष्ठेच्या 'बोइंग – ७८७' मालिकेतील विमानाला झालेला हा पहिलाच अपघात. मोठ्या शहरातील नागरी वस्तीत इतके प्रचंड विमान कोसळून जमिनीवर झालेली मनुष्यहानीही अशीच दुर्दैवी ऐतिहासिक. अशा अपघातांची फारशी सवय नसलेल्या सध्याच्या किमान दोन पिढ्यांसाठी ही घटना विलक्षण धक्कादायक ठरते. या विमान दुर्घटनेनंतर संपूर्ण देशभर पसरलेली सुन्नता लवकरच निवळू लागेल. जखमा भरून यायला वेळ लागेल. अपघातासंदर्भातील प्रश्नांची उत्तरे मिळण्यास कदाचित त्याहूनही अधिक वेळ लागेल. विमानातील प्रवाशांप्रमाणेच नजीकच्या वैद्यकीय महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टर, कर्मचाऱ्यांचाही हकनाक मृत्यू झाला.

भारतीय कृषी क्षेत्राचे अनेक शत्रू आहेत. ज्यातील काही समोर येऊन युद्ध करतात तर उरलेले या शत्रूंना लढण्यासाठी पाठीमागून रसद पुरवितात जेणे करून युद्ध दीर्घकाळ चालावे आणि शेतकऱ्यांचा पराभव व्हावा. १९६० च्या उत्तरार्धात सुरू झालेला हरितक्रांतीचा २०२४ पर्यंतचा इतिहास सांगतो.

## प्लास्टिकचा भस्मासूर शेतांना गिळंकृत करू पाहतोय

लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आणि कितीतरी शेतमजूर म्हणून आनंदाने शासकीय नोकराप्रमाणे जीवन जगणे स्वीकारले. कृषी क्षेत्राच्या रंगणगणात शेतकऱ्याबरोबर समोरासमोर लढणारे शत्रू म्हणजे विविध प्रकारच्या आळ्या, कीटक, जिवाणू यांची कीड, जंगले उद्ध्वस्त झाल्यामुळे शेतात प्रवेश करणारे वन्य प्राणी, बियाणांमधील फसगत आणि शेतकऱ्यांमधील आपआपसातील नकारात्मक स्पर्धा. अप्रत्यक्ष शत्रू म्हणजे मुबलक प्रमाणावर वापरण्यात येणारी विविध प्रकारची रासायनिक खते, डोळ्यांना न दिसणाऱ्या अक्षरांमध्ये माहिती लिहिलेले कीटकनाशकांचे डबे, यामधून होत असलेले शेत जमिनींचे वाळवंटीकरण, खोल गेलेले भूजल आणि सर्वात मोठा आणि तेवढाच महत्वाचा म्हणजे कृषी क्षेत्रात वेगाने पसरत असलेला प्लास्टिकचा महापूर. पण शेतकऱ्यांचा खरा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष शत्रू म्हणजे त्यांना मिळणारी



विविध अनुदाने आणि रेवडी पध्दतीने होत असलेले शासकिय निधींचे मुबलक वाटप.'नेचर' ही जगामधील वैज्ञानिक संशोधनास वाहून घेतलेली सर्वांत जुनी पत्रिका. या पत्रिकेचे मुख्य वैशिष्ट म्हणजे यामध्ये प्रसिध्द होणारे सर्व संशोधन लेख उच्च दर्जाचे असतात म्हणूनच अनेक वेळा ते 'नोबेल' पारितोषिकास पात्र ठरले जाते. मागील आठवड्यात याच विज्ञान पत्रिकेत प्लास्टिक संदर्भात युनिव्हर्सिटी ऑफ लीड्स, इंग्लंडमधील संशोधक जोशुआ डब्ल्यू. कॉटम, एड कुक आणि कोस्टास ए. वेलिस यांनी संशोधित केलेला एक आढावा प्रसिध्द झाला. ज्यात या तीन शास्त्रज्ञांनी स्पष्ट म्हटले आहे की दरवर्षी जगातील तब्बल १९५ राष्ट्रे ३०० दशलक्ष टन एवढा प्लास्टिकचा कचरा तयार करतात ज्यामध्ये भारताचे स्थान ९.३ दशलक्ष टन प्लास्टिक कचऱ्यासह पहिले आहे. यातील ५.८ दशलक्ष टन प्लास्टिक जाळले जाते तर उर्वरित ३.५ दशलक्ष टन कृषी क्षेत्र म्हणजे जमीन, हवा आणि पाण्यात अगदी सहजपणे सोडले जाते. विशेष म्हणजे यावर मुळ स्थानापासून ते त्याचे निसर्गात विघटन होईपर्यंत कुठलेही नियंत्रण नाही.प्लॅस्टिकचे उघड्यावर होणारे ज्वलन हवा प्रदूषित करते आणि अनेक घातक आजारांना आमंत्रण देते. या आजारांत श्वसनाचे आजार आणि कर्करोग यांची प्रथम क्रमांकावर कोण यासाठी आपआपसात स्पर्धा सुरू आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये जगामधील तब्बल ५० हजार ७०२ नगरपालिका, महानगरपालिकेचे दैनंदिन कचरा व्यवस्थापन गृहीत धरले आहे. भारत प्लास्टिक कचरानिर्मितीमध्ये जगात अग्रस्थानी येण्यास येथील वाढती लोकसंख्या जेवढी जबाबदार आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बच्चू कडूंच्या हातात भोपळा!

## सात दिवसांनी सरकारने चॉकलेट दिल्याची चर्चा?

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**प्रहार संघटना प्रमुख आणि माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या सात दिवस चाललेल्या अन्नत्याग आंदोलनाचे महायुती सरकारने भरीत केले असून ज्या महसूलमंत्र्यांवर कडू चिडले होते त्याच मंत्र्यांच्या समिती गठीत करण्याच्या आश्वासनावर आक्रमक बच्चू कडू याना आंदोलन मागे घ्यावे लागल्याने त्यांच्या हातात सरकारने भोपळा दिल्याची चर्चा सुरु झाली आहे.**



अमरावती जिल्ह्यातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीपुढे शेतकरी कर्जमाफी सह १७ विविध मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन सुरु केले होते. शनिवारी १४ जून रोजी आंदोलनाचा सातवा दिवस असताना बच्चू कडू यांचे वजन घटले आणि रक्ताची उलटी झाल्यावर कडू यांचे मनोधैर्य खचल्याचे सांगितले जाते. कर्जमाफीची घोषणा करून महायुती सरकार आपल्याला श्रेय देणार नाही याचा अंदाज असलेल्या बच्चू कडू यांनी राज्यभरातील शेकडो कार्यकर्त्यांच्या विनंतीला मान देत आंदोलन पुढे ढकलत असल्याचे जाहीर करीत आंदोलन मागे घेतले. शनिवारी महायुतीचे दूत आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी कडू यांच्याशी दीडतास चर्चा करीत आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. याच दरम्यान बच्चू कडू आणि एकनाथ शिंदे यांचाही संवाद घडवून आणला. शिंदे यांनी बच्चू कडू यांच्या कानात असा कोणता प्रभावी मंत्र दिला की ज्यामुळे कडू यांनी आंदोलन मागे घेतले याची चर्चा आता राज्यभर सुरु झाली आहे. अभिनव आंदोलने करण्यात आणि त्याची सर्वदूर प्रसिद्धी करण्यात बच्चू कडू निष्णात आहेत , सार्वजनिक आंदोलने यांचे रूपांतर डिजिटल इव्हेंटमध्ये करण्याची उत्तम हातोटी त्यांच्याकडे असल्याने हे आंदोलन शुद्ध अवघ्या सात दिवसात राज्यभरात गाजले होते. बच्चू कडू यांच्या आंदोलनाला महाविकास आघाडीने पाठिंबा दिला होता. एका बाजूला बाचूऊ कडू यांचे समर्थक एकेक आमदार आणि खासदार यांचे समर्थन पत्र गोळा करीत होते तर दुसरीकडे सरकारवर बच्चू कडू दबाव आणण्याचा प्रयत्न करीत होते मात्र भाजपने महसूलमंत्री बावनकुळे यांच्या हातात हा विषय देत कडू याना काहीसे बाजूला सारण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले. अन्नत्याग आंदोलन आपण मागे घेतले नाही तर काहीकाळ स्थगित केले आहे ,येत्या दोन ऑक्टोबर पर्यंत कर्जमाफी झाली नाही तर पुन्हा दोन ऑक्टोबर रोजी अभूतपूर्व आंदोलन उभारण्याचा इशारा बच्चू कडू यांनी देत हे आंदोलन गनिमी काव्याचे असेल असाही इशारा महायुती सरकारला दिला आहे. पुढचे आंदोलन कदाचित मुंबईत करण्याचा बच्चू कडू यांचा प्लॅन असल्याचे बोलले जाते. बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाला सात दिवसात राज्यव्यापी स्वरूप आले होते.आंदोलन उचलून धरले होते मात्र अचानक कडू यांची प्रकृती फारसी बिघडली नसताना माघार घेण्यात आल्यामुळे त्याचा प्रभाव पडू शकला नाही.

### रिकाम्या हाताने माघार

बच्चू भाऊंचे आंदोलन नेहमीच फार्स झाला मात्र आणखी दोन दिवस त्यांनी तग धरली असती तर राज्यात वेगळे वातावरण निर्माण झाले असते असेही राजकीय निरीक्षकांचे म्हणणे आहे. अमरावती जिल्ह्यातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधीपुढे शेतकरी कर्जमाफी सह १७ विविध मागण्यांसाठी बच्चू कडू यांनी अन्नत्याग आंदोलन सुरु केले होते. शनिवारी १४ जून रोजी आंदोलनाचा सातवा दिवस असताना बच्चू कडू यांचे वजन घटले आणि रक्ताची उलटी झाल्यावर कडू यांचे मनोधैर्य खचल्याचे सांगितले जाते. कर्जमाफीची घोषणा करून महायुती सरकार आपल्याला श्रेय देणार नाही याचा अंदाज असलेल्या बच्चू कडू यांनी राज्यभरातील शेकडो कार्यकर्त्यांच्या विनंतीला मान देत आंदोलन पुढे ढकलत असल्याचे जाहीर करीत आंदोलन मागे घेतले.

## राष्ट्रवादीचे विलीनीकरण, अनिश्चिततेचा धूर अन् धुरळा...

## काका म्हणतात सुप्रिया बघेल तर ताई म्हणतात कार्यकर्ते ठरवतील!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शरद पवार आणि अजित पवार या मातब्बर नेत्यांच्या नेतृत्वाखालील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक नेत्यांची लंबीचौडी भाषणे होऊनही या पक्षांच्या वर्धापनदिनी दोन स्वतंत्र ठिकाणी जमलेल्या गर्दीतील प्रत्येक कार्यकर्ता परत जाताना 'पण विलीनीकरणाचं काय.**



या प्रश्नाचे कोडे मनात घेऊनच परतला. त्यामुळे आगामी काळात लढताना एकमेकांवर वार करायचे का खांद्याला खांदा लावायचा? याविषयीचे त्याचे गूढ कायमच राहिले... याचे कारण दोन्ही पक्षांनी याबाबत बाळगलेले मौन आणि त्यामुळेच उरला अनिश्चिततेचा धूर अन् संशयाचा धुरळा.राष्ट्रवादी काँग्रेसचा २६वा वर्धापनदिन नुकताच होऊन गेला. यापैकी २४ वर्धापनदिन एकसंघ राष्ट्रवादीने साजरे केले. अजितदादांनी २ जुलै २०२२ रोजी केलेल्या बंडानंतर दोन पक्षांनी स्वतंत्रपणे साजरा केलेला हा दुसरा वर्धापनदिन ठरला. विभाजनानंतरच्या अवघ्या उण्यापुऱ्या दोनच वर्षांनी या दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाची चर्चा का सुरू झाली असावी, या प्रश्नाची उत्तरे शोधण्याआधी वर्धापनदिनाच्या निमित्ताने पक्षाच्या पाव शतकी वाटचालीचा थोडक्यात आढावा घेणे योग्य ठरेल.सोनिया गांधी यांच्या विदेशीपणाचा मुद्दा मांडत शरद पवार यांनी काँग्रेसपासून फारकत घेतली ती १९९९ मध्ये, त्याच वर्षी त्यांनी पुण्यातच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेची घोषणा केली. तो काँग्रेसचा सुगीचा काळ होता, त्यामुळे स्थापनेनंतर आतापर्यंतच्या काळात पवारांनी आपल्या बाजूने मागितलेल्या कौलाला जनता जनार्दनाने कधीच त्यांच्या बाजूने एकतर्फी दान दिले नाही. तरीही राष्ट्रबादी काँग्रेस पक्ष स्थापनेपासूनच राज्यातील एक लक्षणीय शक्ती म्हणून पुढे आला, असे म्हणावे लागेल. स्थापनेनंतर त्याच वर्षी लगेचच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाला ५८ जागा आणि २२.६० टक्के मते मिळाली. पहिल्या क्रमांकाच्या ७५ जागा मिळवलेल्या काँग्रेसच्या साथीने पहिल्याच वर्षी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेत आला.

### राज्यातही 2014 पासून सुरु

मुसंडी मारत व काँग्रेसला मागे टाटत ७१ जागा व १८ टक्के मते मिळवली. सर्वाधिक जागा घेणारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा काँग्रेसच्या ६९ जागांच्या मदतीने सत्तेत आला. त्यावेळी हातातोंडाशी आलेले मुख्यमंत्रिपद नाकारण्याचा शरद पवार यांचा अनाकलनीय निर्णय हीच राष्ट्रवादीच्या आताच्या फुटीची नांदी होती. राष्ट्रवादी काँग्रेसकडून त्यावेळी अजितदादांना मिळू शकणारे मुख्यमंत्रिपद नाकारण्यात आले आणि अजितदादांच्या कपाळावर काकांबाबतची पहिली आठी पडली. पुढच्या पंचवार्षिकमध्ये महणजे २००९ च्या निवडणुकीत काँग्रेसने ८२ जागा घेत पहिले स्थान मिळवले तरी त्या पक्षाला ६२ जागा घेणाऱ्या दुसऱ्या क्रमांकावरच्या राष्ट्रवादीबरोबर आघाती करावीच लागली.झालेल्या मोदी पर्वात भाजपचा तडाखा काँग्रेसबरोबरच राष्ट्रवादीलाही बसला.

# भारत-पाकिस्तानमधील संघर्ष थांबवला!

## इराण-इस्रायलचाही थांबवू : ट्रम्प यांचं शांततेसाठी आवाहन

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इराण आणि इस्रायल एकमेकांवर मोठ्या प्रमाणात हल्ले-प्रतिहल्ले चढवत असताना आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी आवाहन केले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी रविवारी सायंकाळी ट्रुथ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट टाकून सदर आवाहन केले. ‘भारत आणि पाकिस्तानमध्ये ज्या प्रकारे तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न केला, त्याप्रमाणेच इराण आणि इस्रायलसाठीही प्रयत्न करू शकतो’, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.**



ट्रुथवर केलेल्या पोस्टमध्ये ट्रम्प म्हणाले, “इराण आणि इस्त्रायलने एकमेकांशी करार करावा, ते करतील अशी खात्री आहे. ज्याप्रमाणे मी भारत आणि पाकिस्तान यांच्यात करार करायला लावला. अमेरिकेशी व्यापार करार करून दोन्ही नेत्यांनी तात्काळ निर्णय घेतला आणि संघर्ष थांबविला.”मध्य पूर्वेत संघर्ष पेटला असताना डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, पडद्याआडून ते फोनवर संपर्क साधत आहेत आणि काही बैठकाही घेत आहेत. लवकरच इराण आणि इस्रायलमध्ये शांतता प्रस्थापित होईल.दरम्यान, भारत-पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधी होण्यासाठी ट्रम्प यांनी प्रयत्न केल्याचा दावा भारताने खोडून काढला होता. भारत आणि पाकिस्तानच्या डीजीएमओंनी एकमेकांशी थेट संवाद साधून लष्करी कारवाई थांबविण्याबाबत निर्णय घेतला होता, असे भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनी जाहीर केले होते. माझ्या पहिल्या कार्यकाळात सर्बिया, कोसोवो, इजिप्त आणि इथिओपिया सारख्या देशांत शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले होते.

, मी खूप काही करतो, पण त्याचे श्रेय मला कधीही मिळत नाही, असेही ट्रम्प यावेळी म्हणाले.दरम्यान शनिवारी ट्रम्प यांनी इराणला इशारा दिला होता. इस्रायलने तेहरानमधील इराणच्या संरक्षण मंत्रालयाच्या मुख्यालयाला लक्ष्य केले होते. या हल्ल्याशी अमेरिकेचा कोणताही संबंध नसल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले. याचबरोबर डोनाल्ड ट्रम्प यांनी इशारा दिला की, जर इराणने अमेरिकेवर कोणत्याही प्रकारे हल्ला करण्याचा प्रयत्न केला तर अमेरिकन सैन्य त्याला पूर्ण ताकदीने उत्तर देईल. ट्रुथवर केलेल्या पोस्टमध्ये

### मंत्रालयाच्या मुख्यालयाला लक्ष्य

मी खूप काही करतो, पण त्याचे श्रेय मला कधीही मिळत नाही, असेही ट्रम्प यावेळी म्हणाले.दरम्यान शनिवारी ट्रम्प यांनी इराणला इशारा दिला होता. इस्रायलने तेहरानमधील इराणच्या संरक्षण मंत्रालयाच्या मुख्यालयाला लक्ष्य केले होते. या हल्ल्याशी अमेरिकेचा कोणताही संबंध नसल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले. याचबरोबर डोनाल्ड ट्रम्प यांनी इशारा दिला की, जर इराणने अमेरिकेवर कोणत्याही प्रकारे हत्तर देईल.इराण आणि इस्रायल एकमेकांवर मोठ्या प्रमाणात हल्ले-प्रतिहल्ले चढवत असताना आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी आवाहन केले आहे.

ट्रम्प म्हणाले, “इराण आणि इस्त्रायलने एकमेकांशी करार करावा, ते करतील अशी खात्री आहे. ज्याप्रमाणे मी भारत आणि पाकिस्तान यांच्यात करार करायला लावला. अमेरिकेशी व्यापार करार करून दोन्ही नेत्यांनी तात्काळ निर्णय घेतला आणि संघर्ष थांबविला.”मध्य पूर्वेत संघर्ष पेटला असताना डोनाल्ड ट्रम्प म्हणाले की, पडद्याआडून ते फोनवर संपर्क साधत आहेत आणि काही बैठकाही घेत आहेत. लवकरच इराण आणि इस्रायलमध्ये शांतता प्रस्थापित होईल.दरम्यान, भारत-पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधी होण्यासाठी ट्रम्प यांनी प्रयत्न केल्याचा दावा भारताने खोडून काढला होता. भारत आणि पाकिस्तानच्या डीजीएमओंनी एकमेकांशी थेट संवाद साधून लष्करी कारवाई थांबविण्याबाबत निर्णय घेतला होता, असे भारताच्या परराष्ट्र मंत्र्यांनी जाहीर केले होते. माझ्या पहिल्या कार्यकाळात सर्बिया, कोसोवो, इजिप्त आणि इथिओपिया सारख्या देशांत शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले होते.

# ‘लाईक, व्ह्यूजसाठी ‘त्या’ फोटोचा गैरवापर

## मृतांच्या नातेवाईकानं इन्फ्लुएन्सरना सुनावलं

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून गुरूवारी (१२ जून) एअर इंडियाच्या विमानाने लंडनसाठी उड्डाण घेतले. मात्र अवघ्या ९ सेकंदात विमान कोसळले. यात २४१ प्रवाशांना प्राण गमवावे लागले. तर विमान जिथे कोसळले तेथील ३० हून अधिक जणांचा बळी गेला. या अपघातात २७० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून त्यांचे कुटुंबिय या दुःखातून अजून सावरलेले नाहीत. अशातच या शोकांतिकेचा गैरवापर काही इन्फ्लुएन्सर करत असल्याचा आरोप मृतांच्या कुटुंबियांनी केला आहे.**



एअर इंडिया अपघातानंतर ‘शेवटचा सेल्फी’ व्हायरल झाला. डॉ. कोमी व्यास, पती प्रतीक जोशी आणि त्यांच्या तीन मुलांचा शेवटचा सेल्फी इंटरनेटवर व्हायरल होताच, अनेकांचे हृदय पिळवटून निघाले. संपूर्ण जोशी कुटुंब अपघातात गेल्यामुळे हळहळ व्यक्त करण्यात आली. आता डॉ. कोमी व्यास यांचे चुलत भाऊ कुलदीप भट यांनी या फोटोचा गैरवापर होत असल्याची खंत व्यक्त केली आहे. त्यांनी काही इन्फ्लुएन्सर्सचा उल्लेख करत त्यांच्यावर टीका केली.भट यांनी आरोप केला की, इन्फ्लुएन्सर स्वतःचे लाइक्स आणि व्ह्यूज वाढविण्यासाठी चुकीची माहिती पसरवत आहेत. एडिटेड फोटो, मृतांचे खोटे व्हिडीओ वापरून स्वतःच्या व्हिडीओंना व्ह्यूज वाढविण्याचा प्रयत्न करत आहेत. भट म्हणाले, माझे आणि इतर २७० मृतांचे कुटुंबिय सध्या मानसिक धक्क्यात आहेत. आमच्या दुःखाचा

### कुटुंबाचा त्रास वाढला

तिच्या डीएनए चाचणीने नमुने अजून जुळलेले नाहीत. तरीही तिच्यावर अंत्यसंस्कार झाल्याचा व्हिडिओ तयार करण्यात आला आहे. डॉ. कोमी यांच्या नावाने बनावट सोशल मीडिया अकाऊंट्स तयार केल्यामुळेही कुटुंबाचा त्रास वाढला असल्याचे भट यांनी सांगितले. मी सर्व सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सना विनंती करतो की, कृपया हे थांबवा.एअर इंडियाच्या एआय-१७१ या विमानाचा अपघात होऊन विमानातील २४२ पैकी २४१ प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाला. लंडनसाठी निघालेले विमान काही अंतरावर असलेल्या मेघानी नगर भागात कोसळले. या अपघातामध्ये डॉ. कोमी व्यास, पती प्रतीक जोशी, मुलगी मिराया आणि प्रद्युत आणि नकुल ही जुळी मुले मरण पावली.

वापर इन्फ्लुएन्सर स्वतःच्या लाभासाठी करत आहेत.भट यांनी पुढे म्हटले की, माझी बहीण डॉ. कोमी यांनी विमानात बसल्यानंतर कुटुंबाचा एक सेल्फी घेतला आणि आमच्या कौटुंबिक ग्रुपवर शेअर केला. तो फोटो नंतर व्हायरल झाला. काही लोक त्या फोटोवरून व्हिडीओ तयार करत आहेत. असाच एक एआय जनरेटेड व्हिडीओ संबंध देशभरात व्हायरल झाला आहे. एवढेच नाही तर डॉ. कोमी यांची मोठ्या मुलीबाबतही गैरसमज पसरवले जात आहेत.

# हृतिक रोशन-सबा आझादच्या नात्याला 3 वर्षे पूर्ण

हृतिक रोशन आणि सबा आझाद अनेकदा विविध कार्यक्रमांमध्ये एकत्र दिसतात. मुलाखतींमध्ये त्यांनी त्यांच्या नात्याबद्दल फारसं उघडपणे बोललं नसलं तरी ते सोशल मीडियावर त्यांचे फोटोज पोस्ट करतात. अलीकडेच, हृतिक आणि सबा यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट लिहून त्यांच्या नात्याला ३ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल एकमेकांना शुभेच्छा दिल्या.हृतिक आणि सबाने एक फोटो शेअर केला ज्यात हृतिकने एक गोल टोपी घातलेली आहे आणि त्याच्या डोळ्यांवर चष्मा आहे. सबाने तिच्या हाताने हृतिकचा हात पकडलेला दिसतो. हृतिकने त्याच्या पोस्टला , "हॅपी ॲनिव्हर्सरी पार्टनर" असं कॅप्शन दिलं तर सबाने देखील तिच्या इन्स्टाग्राम हँडलवर हाच फोटो शेअर करत "हॅपी ३ इयर्स पार्टनर." असं लिहिलं आहे. हृतिकच्या पूर्वाश्रमीची पत्नी सुजैन खानने या पोस्टवर कमेंट केली आहे. सुजैनने या पोस्टवर "सुपर पिक!! हॅपी ॲनिव्हर्सरी अशी कमेंट केली आहे. हृतिकची पुतणी पश्मीना रोशनने देखील या पोस्टवर कमेंट केली आहे. तिने "आह्ह, किती गोड!" असं लिहील आहे.हृतिक आणि सबा २०२२ पासून अनेकदा एकत्र दिसतात. ते करण जोहरच्या ५० व्या वाढदिवसाच्या पार्टीला हातात हात घालून एकत्र पोहोचले होते. अलीकडेच सबा २०२४ च्या गणेश चतुर्थी उत्सवात हृतिकचे वडील राकेश रोशन यांच्या घरी सहभागी झाली होती. ती पिंकी रोशन, सुनैना रोशन आणि रोशन कुटुंबातील इतर सदस्यांबरोबर गणपतीची आरती करताना दिसली.हृतिकने यापूर्वी इंटीरियर डिझायनर सुजैन खानबरोबर लग्न केले होते आणि त्यांना रेहान आणि ऋधान ही दोन मुलं आहेत . २०१४ मध्ये त्यांनी घटस्फोट घेतला असून ते एकत्र मुलांचा सांभाळ करत आहेत. सुजैन, ज्येष्ठ अभिनेता संजय खान आणि झरीन खान यांची मुलगी आहे, ती सध्या आर्सलान गोनीला डेट करत आहे. हृतिक पुढे यशराज फिल्म्सच्या 'वॉर २' मध्ये दिसणार आहे, याचे दिग्दर्शन अयान मुखर्जी करत आहेत.

## संतोषींना दोन वर्षांचा तुरुंगवास

बॉलिवूडचे दिग्गज दिग्दर्शक अशी ओळख असलेल्या राजकुमार संतोषी यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. जामनगर न्यायालयाने त्यांना दोन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. चेक बाऊन्स प्रकरणात ही शिक्षा सुनावण्यात आली आहे. राजकुमार संतोषी यांनी दोन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावत असताना चेकच्या दुप्पट रक्कम दंड म्हणून जमा करण्याचेही आदेश दिले आहेत.राजकुमार संतोषी यांनी घायल, घातक यांसारख्या सिनेमांचं दिग्दर्शन केलं आहे. संतोषी यांनी जामनगरचे व्यावसायिक अशोकलाल यांच्याकडून एक कोटी रुपये घेतले होते. मात्र ते पैसे परतच केले नाहीत. यानंतर अशोकलाल हे राजकुमार संतोषींच्या विरोधात न्यायालयात गेले. ज्यानंतर जामनगर न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.राजकुमार संतोषी यांचं चेक बाऊन्सचं हे प्रकरण २०१५ मधलं आहे.

## राधिकाचा 'तो' व्हिडीओ व्हायरल



राधिका आपटे ही हिंदी आणि मराठी सिनेसृष्टीत तसंच वेब सीरिजमध्ये काम करणारी एक नावाजलेली अभिनेत्री आहे. तसंच तिने आत्तापर्यंत काही दाक्षिणात्य सिनेमांमध्येही काम केलं आहे. सुपरस्टार रजनीकांत यांच्यासह ती 'कबाली' या सिनेमात झळकली होती. सध्याच्या घडीला राधिका आपटेचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडीओत तिने दाक्षिणात्य सिनेसृष्टीवर भाष्य केलं आहे. राजीव मसंद यांनी घेतलेलेल्या मुलाखतीतला हा व्हिडीओ आहे.राधिका आपटेचा एक जुना व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओत राधिका पत्रकार राजीव मसंद यांच्याशी संवाद साधताना दिसत आहे. तिने तेलुगू सिनेसृष्टीबद्दल भाष्य केलं आहे. राधिका म्हणते,"तेलुगू सिनेसृष्टीत अर्थात टॉलिवूडमध्ये मला सर्वात जास्त संघर्ष करावा लागला. टॉलिवूड पितृसत्ताक आणि पुरुषप्रधान आहे. सिनेमांत महिलेला चांगला दर्जा देत असले तरी प्रत्यक्षात सेटवर मात्र वेगळं चित्र पाहायला मिळतं. पुरुष कलाकारांकडून महिला कलाकारांना देण्यात येणारी वागणूक वेगळी आहे."राधिका आपटेचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर नेटकऱ्यांनी तिला ट्रोल केलं आहे. तुझ्या अशा वागण्यामुळेच टॉलिवूडला तुझी गरज नाही, टॉलिवूडनेच 'बाहुबली', 'पुष्पा' आणि 'ॲनिमल'सारखे ब्लॉकबस्टर सिनेमे बॉलिवूडला दिले आहेत. एक वाईट अनुभव संपूर्ण इंडस्ट्रीबद्दल कसा काय असू शकतो? तेलुगू इंडस्ट्रीला बदनाम करण्याचा प्रयत्न, काही लोकांमुळे संपूर्ण इंडस्ट्रीला चुकीचं ठरवू नये, अशा कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत आणि राधिकाला ट्रोल केलं आहे.राधिका आपटे ही वेबसीरिज, हिंदी चित्रपटसृष्टी, मराठी चित्रपटसृष्टी आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत नावाजलेली अभिनेत्री आहे. सेक्रेड गेम्स या सीरिजमध्ये तिने साकारलेली अंजली माथूर या रॉ एजंटची भूमिका प्रेक्षकांच्या अजूनही स्मरणात आहे.

## मला माहित नाही मी कसे हसले

अर्चना पुरण सिंग यांनी सिनेमात अनेक विनोदी भूमिका साकारल्या आहेत. सध्या त्या कपिल शर्मा शोमध्ये प्रेक्षकांना इतर कलाकारांप्रमाणे स्किट न करता त्या आपल्या हसण्याने प्रेक्षकांना रंगतदार क्षण देतात. त्यांच्या हसण्यामुळे शोमधील काही कंटाळवाणे क्षणदेखील मनोरंजक बनतात. मात्र, कौटुंबिक संकटाचा सामना करत असतानाही असे प्रदर्शन करणे सोपे नसते. अलीकडील एका मुलाखतीत, अर्चना यांनी एका कॉमेडी शो दरम्यान आलेल्या कठीण प्रसंगाचा उल्लेख केला. त्या सांगतात की, त्यांच्या सासूबाईंचे निधन झाले होते, परंतु त्यांना तरीही शोमध्ये हसावे लागले होते.'इन्स्टंट बॉलीवूड'ला दिलेल्या मुलाखतीत अर्चना म्हणाल्या, "एका कॉमेडी शोदरम्यान, मला बातमी मिळाली की माझ्या सासूबाई गेल्या आहेत. आम्ही त्या कार्यक्रमाचा अर्धा भाग शूट केला होता आणि मी त्यांना सांगितले की, मला जावे लागेल, परंतु त्यांनी मला शोच शूटिंग पूर्ण होईपर्यंत बसण्याची विनंती केली. त्यानंतर मला काही काळ बसून हसायला लागले."

मी शोसाठी हसत होते आणि माझ्या मनात विचार येत होता की, माझ्या सासूबाई नुकत्याच गेल्या आहेत आणि आता घरात काय चालले असेल. मला माहीत नाही याकाळात, मी कसे हसले. पण ३०-४० वर्षे या इंडस्ट्रीत काम केल्यावर, तुम्हाला समजते की निर्मात्यांचे पैसे गुंतलेले असतात. तुम्ही तुमचे काम अपूर्ण सोडू शकत नाही. माझ्या पतीलाही हे समजले, असं अर्चना पुरण सिंग म्हणाल्या.



## अनुष्काने कारकिर्दीच्या शिखरावर असताना विराटशी

क्रिकेट आणि बॉलीवूड जगतातील अनेक जोडपी आपण पाहिली आहेत. पण त्यापैकी विराट कोहली आणि अनुष्का शर्माची जोडी खूपच प्रसिद्ध आहे. विराट-अनुष्का सर्वाधिक फॉलो केलं जाणारं सेलिब्रिटी कपल आहे. विराट-अनुष्काच्या जोडीला चाहते विरूष्का म्हणतात. विराट अनुष्काने २०१७ मध्ये लग्न केलं आणि आता दोघांनाही दोन मुलं आहेत. अनुष्काने आता विराट कोहलीसह लग्न करण्याबाबत मोठा खुलासा केला आहे.डिसेंबर २०१७ मध्ये दोघांनीही इटलीमध्ये मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत लग्न केलं होतं. अनुष्का आणि विराटची पहिली भेट एका जाहिरातीच्या शूटिंग दरम्यान झाली आणि इथूनच त्यांचे लव्हस्टोरीला सुरूवात झाली. आता अनुष्का शर्मानि विराट कोहलीशी लग्न करण्याचे कारण सांगितले आहे.

चित्रपट अभिनेत्री अनुष्का शर्मानि तिच्या कारकिर्दीच्या शिखरावर असताना विराट कोहलीशी लग्न केलं. त्यावेळी अनुष्का शर्मा २९ वर्षांची होती. सहसा बॉलिवूड अभिनेत्री त्यांच्या करिअरमुळे लवकर लग्न करणं टाळतात, परंतु अनुष्कानेही विचारसरणी मोडून प्रेमाला प्राधान्य दिले. ICC चा मोठा निर्णय! फिल्डिंगच्या नियमांत केला बदल; सीमारेषेच्या बाहेर-जाऊन आत येऊन टिपणारा झेल आता. एका मुलाखतीत अनुष्काने तिच्या निर्णयाबद्दल मोकळेपणाने सांगितले. तिने म्हटलं की, चाहते खूप समजूतदार आहेत. तुम्ही विवाहित आहात की आई आहात हे त्यांना महत्त्वाचे नाही, जोपर्यंत तुम्ही पडद्यावर चांगले काम करत आहात तोपर्यंत चाहते तुम्हाला पाठिंबा देत राहतील. अनुष्का म्हणाली, "मी २९व्या वर्षी लग्न केलं, जे या इंडस्ट्रीमध्ये खूप तरूण वयात लग्न केलं असं मानलं जातं. पण मी लग्न केलं कारण मी प्रेमात पडली होती आणि मी अजूनही प्रेमात आहे."

# दिल्ली संघात विचित्र माणसं होती!

## एबी डिविलियर्सचा आयपीएल संघाबाबत मोठा खुलासा

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज खेळाडू एबी डिव्हिलियर्सच्या वक्तव्याने सगळीकडेच खळबळ उडाली आहे. मैदानात ३६० डिग्री फटकेबाजी करणारा विस्फोटक फलंदाज म्हणून एबीची ओळख आहे. एबी डिव्हिलियर्स आयपीएलमध्ये खेळताना दिसला आहे. दरम्यान त्याने दिल्ली डेअरडेव्हिल्स संघाबाबत मोठा खुलासा केला आहे.**





दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटपटू एबी डिव्हिलियर्सने आयपीएलमध्ये दिल्ली डेअरडेव्हिल्स (आता दिल्ली कॅपिटल्स) कडून खेळतानाचा अनुभव सांगताना त्याने खळबळजनक दावा केला आहे. त्याने म्हटले आहे की फ्रँचायझीची स्थिती वाईट होती आणि संघात अनेक वाईट लोक भरली होती. डिव्हिलियर्स २००८ ते २०१० पर्यंत दिल्लीचा भाग होता.डिव्हिलियर्सने दिल्ली डेअरडेव्हिल्सकडून २८ सामने खेळले आणि एक शतक आणि तीन अर्धशतकांसह सुमारे ७०० धावा केल्या होत्या. तो २०११ मध्ये आरसीबीच्या ताफ्यात सामील झाला आणि २०२१ मध्ये निवृत्त होईपर्यंत त्याच संघाकडून खेळला. दिल्लीच्या संघात असताना एबी फक्त एकच हंगाम चांगला खेळला होता.डिव्हिलियर्सने दिल्लीकडून खेळण्याच्या त्याच्या अनुभवाबद्दल CRICKET.COM शी बोलताना सांगितले की, "मी कोणाची नाव घेत नाही. पण दिल्ली डेअरडेव्हिल्स संघाची परिस्थिती वाईट होती. संघात खूप विचित्र आणि तेढ पसरवणारी माणसं होती." संघात अनेक दिग्गज खेळाडू होते. माझ्यासाठी ते क्षण अजूनच कडवट होते कारण मी माझे मुद्दे मांडायचो, बोलायचो. माझ्या सर्व चांगलं लक्षात आहे आणि मी माझ्या आयुष्यातील आणि करियरमधील काही महत्त्वाचे क्षण तिथे घालवले होते. ग्लेन मॅकग्रा आणि डेनियल विटोरीबरोबर वेळ घालवला होता, तिथेच माझी त्यांच्याशी चांगली ओळख झाली. हे दिग्गज माझे हिरो होते आणि मला त्यांची फार भिती वाटायची, असं पुढे सांगताना एबी म्हणाला. एबी "मॅकग्रा यांच्याबद्दल सांगू तर, २००६ मध्ये मी त्यांच्याविरुद्ध एका कसोटीत खेळलो होतो आणि मी इतका घाबरलो होतो की श्वासही घेत नव्हतो खरंच आणि मी त्यांच्याशी एक शब्दही बोललो नाही. पुढच्याच क्षणी मी २००८ मध्ये एकदा बसलो होतो आणि ते माझ्या शेजारी बसले होते. ते मला म्हणाले की, तू ज्याप्रकारे खेळतोस ते मला प्रचंड आवडलं. मी अवाक् झालो आणि विचार करत होती की हे काय चाललंय."एबीने

### संघात अनेक दिग्गज खेळाडू होते.

मला काय झालं तेही कळले नाही. त्यामुळे अशा विचित्र गोष्टी घडल्या," डिव्हिलियर्स म्हणाला.दक्षिण आफ्रिकेचा माजी क्रिकेटपटू एबी डिव्हिलियर्सने आयपीएलमध्ये दिल्ली डेअरडेव्हिल्स (आता दिल्ली कॅपिटल्स) कडून खेळतानाचा अनुभव सांगताना त्याने खळबळजनक दावा केला आहे. त्याने म्हटले आहे की फ्रँचायझीची स्थिती वाईट होती आणि संघात अनेक वाईट लोक भरली होती. डिव्हिलियर्स २००८ ते २०१० पर्यंत दिल्लीचा भाग होता.डिव्हिलियर्सने दिल्ली डेअरडेव्हिल्सकडून २८ सामने खेळले आणि एक शतक आणि तीन अर्धशतकांसह सुमारे ७०० धावा केल्या होत्या. तो २०११ मध्ये आरसीबीच्या ताफ्यात सामील झाला आणि २०२१ मध्ये निवृत्त होईपर्यंत त्याच संघाकडून खेळला. दिल्लीच्या संघात असताना एबी फक्त एकच हंगाम चांगला खेळला होता.मी कोणाची नाव घेत नाही. पण दिल्ली डेअरडेव्हिल्स संघाची परिस्थिती वाईट होती. संघात खूप विचित्र आणि तेढ पसरवणारी माणसं होती." संघात अनेक दिग्गज खेळाडू होते.

सांगितलं, "अशा काही कमाल क्षणांपासून ते संघात तेढ निर्माण करणाऱ्या लोकांपर्यंत सर्वांना पाहिलं आहे. नावं सांगण्याची गरज नाही. त्यामुळेच माझ्यासाठी ती ३ वर्ष खूप चढउतार असलेली होती. याचबरोबर मला जसा पाठिंबा हवा होता संघाकडून को मिळाला नाही."दिल्लीने रिटेन करणार सांगत अचानक रिलीज केल्याचा किस्साही एबीने सांगितला. "२००९ चा हंगाम छान होता. मी जवळजवळ संपूर्ण हंगाम दक्षिण आफ्रिकेत खेळलो, परत आलो, मला वाटले की मी यी संघाचा मुख्य खेळाडू असेन. अचानक, परत मला खेळण्याची संधी दिली नाही. त्यामुळे खरोखरच संमिश्र भावना होत्या. मला सांगितले की मला रिटेन करण्यात येणार आहे आणि पुढच्याच क्षणी, मला समजलं की मी लिलावात आहे.

---

# आम्ही फलंदाजी करताना चोकर्स!

## बावूमा खेळताना ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी केले स्लेज

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दक्षिण आफ्रिकेने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाचा पराभव करत २७ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर आयसीसी ट्रॉफी पटकावली आहे. तेंबा बावुमा आणि एडन मारक्रम यांच्या उत्कृष्ट भागीदारीच्या जोरावर आफ्रिकेने विजयी लक्ष्य गाठले. विजयानंतर कर्णधार तेंबा बावूमाने खुलासा केला की सामन्यादरम्यान ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी चोकर्स म्हणत त्यांना स्लेज केलं होतं.**





२०२५ ची वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप जिंकल्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार तेंबा बावूमाने ऑस्ट्रेलियन खेळाडूंबद्दल मोठा खुलासा केला. तो म्हणाला की जेव्हा तो आणि एडन मारक्रम फलंदाजी करत होते तेव्हा त्यांना चोकरच्या टॅगची आठवण करून दिली. ही घटना अंतिम सामन्याच्या चौथ्या दिवशी घडल्याचे सांगितले. बावूमाने पत्रकार परिषदेत याबद्दल सांगितले.दक्षिण आफ्रिकेने शेवटची आयसीसी नॉकआउट ट्रॉफी १९९८ मध्ये जिंकली होती. त्यानंतर, १२ क्वार्टरफायनल, २ सेमीफायनल आणि आयसीसी स्पर्धेच्या एका फायनलमध्ये त्यांचा पराभव झाला. यामुळे, दक्षिण आफ्रिकेला चोकर्स हा टॅग देण्यात आला.

पण लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर त्यांनी हा टॅग पुसून टाकला.

पण ऑस्ट्रेलियन खेळाडू सामन्याच्या चौथ्या दिवशी बावूमा आणि मारक्रमला याची आठवण करून देण्यास विसरले नाहीत. त्यावेळेस दक्षिण आफ्रिकेला जिंकण्यासाठी ६० पेक्षा जास्त धावांची आवश्यकता होती. अनेक मोठे सामने जिंकण्यात अपयशी ठरल्यामुळे चाहत्यांनी दक्षिण आफ्रिकेला 'चोकर्स' या नावाने बराच काळ ट्रोल केले. अनेकांना असं वाटत होतं की ऑस्ट्रेलियाच्या हातात अजूनही एक दिवस आहे आणि त्यात ते कमबॅक करू शकतात. विजयानंतर बोलताना बावूमा

### पुन्हा कधीही तो शब्द ऐकावा लागू नये

अंतिम सामन्याचा सामनावीर ठरलेल्या एडन मारक्रमने देखील चोकर्स शब्दाबद्दल वक्तव्य केलं. तो म्हणाला, "पुन्हा कधीही तो शब्द ऐकावा लागू नये, हे नक्की. जिंकून तो टॅग पुसून काढणं ही या संघासाठी खूप मोठी गोष्ट आहे." या विजयासह, दक्षिण आफ्रिका हा न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियानंतर WTC विजेतेपद जिंकणारा तिसरा संघ बनला.

म्हणाला की, ऑस्ट्रेलियाच्या एका खेळाडूने म्हटलं की, चौथ्या दिवशी विजयासाठी ६९ धावांची आवश्यकता असूनही ८ विकेट्स शिल्लक असतानाही ते बाद होऊ शकतात.आम्ही फलंदाजी करत असताना, आम्हाला ऑस्ट्रेलियन खेळाडू "चोक" हा भयानक शब्द वापरताना ऐकू येत होतं. आम्हाला चोकर असल्याचं सकाळीही हिणवलं. त्यांच्या एका खेळाडूने आम्हाला अजूनही सर्वबाद होऊ शकतं असं म्हटलं... मी ते नक्कीच ऐकलं होतं.", असं पत्रकार परिषदेत बावूमा म्हणाला.बावूमा पुढे म्हणाला, "आम्हाला अंतिम फेरी जिंकून अनेक वर्षे झाली आहेत, आमचं नाव इतिहासात मागे गेलं आहे, पण आता आम्ही अशा गोष्टींचा भाग आहोत जे यापूर्वी कधीही झालेलं नाही."

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार ।
। दि. 16 जून 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## दैनंदिन कामकाजात 'एचआर'ची भूमिका आव्हानात्मक

# 'एचआर' उद्योग व्यवसायाचा आत्मा - हर्षवर्धन पाटील

## शिक्षण विश्व: पीएसबी एचआर एक्सलन्स ॲवॉर्ड" सोहळा उत्साहात संपन्न



। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**उद्योग व्यवसायाच्या दैनंदिन कामकाजात 'एचआर'ची भूमिका आव्हानात्मक असते. कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबरोबरच येणाऱ्या प्रत्येक समस्या, प्रश्न यांचा विचार करून निर्णय घ्यावे लागतात. त्यामुळे उद्योग व्यवसायाचे परिचालन नियमित गतीने सुरू ठेवणे शक्य होते, असे मत पुनावाला फाउंडेशनच्या अध्यक्षा पद्मश्री डॉ. लीला पुनावाला यांनी व्यक्त केले.**

पिंपरी चिंचवड एज्युनकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित, पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) आणि पुणे बिझनेस स्कूलच्या (पीबीएस) वतीने "एचआर एक्सलन्स ॲवॉर्ड - २५" सोहळा शनिवारी (दि. १४) बालेवाडी येथे पार पडला. यावेळी पीसीसीओईचे विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, पुनावाला फाउंडेशनचे फिरोज पुनावाला, कोरियन असोसिएशनचे भारतातील प्रतिनिधी एडगर ली, निरंतरा इकोचे प्रसन्न राव, महाराष्ट्र इकॉनोमिक डेव्हलपमेंट कौन्सिलचे उपाध्यक्ष सचिन इटकर, , उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, पीसीसीओईचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीईटी प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ शीतलकुमार रवंदळे, पीबीएस संचालक डॉ. गणेश राव, अधिष्ठाता डॉ. मिनाक्षी त्यागी, आशिष गाकरे आदी उपस्थित होते.

कोणत्याही उद्योग व्यवसायाचा आत्मा म्हणजे एचआर विभाग असतो. व्यवसाय वृद्धीसाठी एचआर अधिकाऱ्यांची गरज आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात आवश्यक कुशल मनुष्यबळ तयार करणे; प्रसंगी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे या बाबतीत एचआरची भूमिका महत्त्वाची असते. देशाच्या भविष्याला आकार देण्याचे काम एचआर प्रतिनिधी करतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही असे पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील म्हणाले.

आधुनिक तंत्रज्ञानामुळे एचआरच्या कामात बदल झाला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर दैनंदिन कामकाजात केला पाहिजे. ज्ञान कक्षा उंचावण्यासाठी आपल्याकडील ज्ञान सहकाऱ्यांना देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे फिरोज पुनावाला यांनी सांगितले.

यावेळी एडगर ली, प्रसन्न राव, सचिन इटकर, जया लक्ष्मी, प्रज्ञा कुलकर्णी प्रदीप गांधी यांनी मनोगत व्यक्त केले. या पुरस्कार सोहळ्यास विविध कंपन्यांमधील ३०० पेक्षा जास्त एचआर अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला होता.

एचआर एक्सलन्स ॲवॉर्डसाठी विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या ५०० पेक्षा जास्त राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय नामांकित कंपन्यांमधून प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या. त्यापैकी प्रथम छाननी नंतर १४० प्रवेशिका परीक्षक मंडळाकडे देण्यात आल्या. यामधून ६० जणांची निवड परीक्षकांनी केली. पुरस्काराचे हे तिसरे वर्ष आहे असे डॉ. गणेश राव यांनी प्रास्ताविकात सांगितले. सूत्रसंचालन आणि आभार डॉ. मिनाक्षी त्यागी मानले.

परीक्षक मंडळामध्ये अमृता खर्डेकर (मास्टरकार्ड), जया लक्ष्मी (गुगल), अभिषेक कुमार (निल्सन आय क्यू), मेघा जशनानी (नॅशडॅग), प्रज्ञा कुलकर्णी (टेलस्ट्रा इंडिया), प्रवीण गांधी (टाटा टेक्नॉलॉजी), समिताभ रॉय (इंडिया अँड पिलीपिन्स फायनान्सियल सोल्युशन्स), राजेश कुमार सिंग (केपीआयटी), डॉ. राजेंद्र हिरेमठ (भाऊ इन्स्टिट्यूट इनोव्हेशन), हेमंत सेठीया (एचआर अँड टीए लीडर), शोभा पांडे (जॉन डियर), डॉ. सदाशिव पाध्ये (किर्लोस्कर न्युमॅटिक), सुकन्या पटवर्धन (माईंड ब्युटिक) आकांक्षा साने (एस. जी. एनॉलिटिक्स), पूजा गांधी (सीनियर एचआर लीड) या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय नामांकित कंपन्यांमध्ये कार्यरत असणाऱ्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा समावेश होता. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of
Excellence
in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



## शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26
ADMISSIONS OPEN

प्रज्वलितो ज्ञानमियो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

# मोरया शिक्षण संस्था, चिंचवड
# डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण









* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292